# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** महानगरपालिका क्षेत्रातील यात्रास्थळांच्या विशेष कार्यक्रमासाठी
**{प्रकल्प विभाग -3}** सहायक अनुदान योजने अंतर्गत धंतोली येथील वर्धा रोड लगत गोरक्षण सभा स्व. मोरोपंत पिंपळे गोरक्षण परिसर येथील विकास करण्याच्या कामाकरीता रु. 2,66,66,666/- (शासन आर्थिक सहभाग रु. 2.00 कोटी, मनपा रु.33,33,333/- व देवस्थान हिस्सा रु. 33,33,333/-) रकमेच्या प्रकल्प राशीस मान्यता प्राप्त आहे. प्राप्त निधी व्यतिरिक्त काम पूर्ण करणे आवश्यक असल्याने विभागाव्दारे तयार करण्यात आलेल्या रु. 3,06,56,242/- रकमेच्या सुधारित प्रस्तावास तांत्रिक मंजूरी प्राप्त आहे.

सबब, प्राप्त निधी व्यतिरिक्त, अतिरिक्त निधी रु. 39,89,576/- राशीच्या कामाकरीता मनपाचे व्यय पद क्रमांक ए 4 2001374603 मधून आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देणे, रु. 3,06,56,242/- रकमेच्या सुधारित प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान तसेच या कामाचे निविदाकार मे. हितेश कंन्स्ट्रक्शन,यांना त्यांचे मंजूर निविदादरावर रु. 39,89,576/- राशीचा कार्यारंभ आदेश निर्गमित करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप :-** 1. विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

2. मे. हितेश कंस्ट्रक्शन, यांना प्रस्तुत काम प्राकलनीय दरापेक्षा 4.75 टक्के कमी दरावर रु. 2,29,13,269/- रकमेचा कार्यादेश क्र. 739/G दिनांक 20.09.2019 अन्वये निर्गमित करण्यात आलेला आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 195/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 30/07/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (प्रकल्प-3), प्रकल्प विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील यात्रास्थळांच्या विशेष कार्यक्रमासाठी सहायक अनुदान योजने अंतर्गत धंतोली येथील वर्धा रोड लगत गोरक्षण सभा स्व. मोरोपंत पिंपळे गोरक्षण परिसर येथील विकास करण्याच्या कामाकरीता रु. 2,66,66,666/- (शासन आर्थिक सहभाग रु. 2.00 कोटी, मनपा रु.33,33,333/- व देवस्थान हिस्सा रु. 33,33,333/-) रकमेच्या प्रकल्प राशीस मान्यता प्राप्त आहे. प्राप्त निधी व्यतिरिक्त काम पूर्ण करणे आवश्यक असल्याने विभागाव्दारे तयार करण्यात आलेल्या रु. 3,06,56,242/- रकमेच्या सुधारित प्रस्तावास तांत्रिक मंजूरी प्राप्त आहे.

सबब, प्राप्त निधी व्यतिरिक्त, अतिरिक्त निधी रु. 39,89,576/- राशीच्या कामाकरीता मनपाचे व्यय पद क्रमांक ए 4 2001374603 मधून आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देणे, रु. 3,06,56,242/- रकमेच्या सुधारित प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान तसेच या कामाचे निविदाकार मे. हितेश कंन्स्ट्रक्शन,यांना त्यांचे मंजूर निविदादरावर रु. 39,89,576/- राशीचा कार्यारंभ आदेश निर्गमित करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.